December - 2019

Impact Factor – 6.625

E-ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY


International E-Research Journal


PEER REFREED & INDEXED JOURNAL

October-November-December 2019

Vol. 6 Issue 4 (B)

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *





Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

RESEARCH JOURNEY
MULTIDISCIPLINARY ONLINE RESEARCH JOURNAL

This Journal is indexed in :
- University Grants Commission (UGC)
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *

254

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625 (2019),
Vol. 6, Issue 4 (B)
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
Oct.-Nov.-Dec. 2019


| | | | |
|---|---|---|---|
| 32 | वीरशैव संतकवी लक्ष्मण महाराजांची हिंदी रचना | डॉ.प्रवीण कारंजकर | 159 |
| 33 | नागपूर जिल्ह्यातील सांस्कृतिक क्षेत्रातील संतांचे कार्य | डॉ. प्रकाश शेन्डे | 163 |
| 34 | मराठी सामाजिक कादंबरी संकल्पनात्मक स्वरूप | श्री.गिरीधर काचोळे | 167 |
| 35 | मराठी साहित्यातील : आंबेडकरवाद | डॉ. गोविंद रावळेकर | 174 |
| 36 | दलित आत्मकथने : भाषिक वैशिष्ट्ये | डॉ. प्रकाश जाधव | 179 |
| 37 | उत्तम कांबळे यांचे कथा वाङ्मय | प्रा. माधव सूर्यवंशी | 186 |
| 38 | ग्रामीण साहित्य आणि सामाजिक चळवळ : एक दृष्टिक्षेप | डॉ. विनोद भालेराव | 189 |
| 39 | गावातील ढासळत चाललेल्या गावपणाचा शोध घेणारे गाव | डॉ.गजानन मुंधे | 192 |
| 40 | रामराव झुंजारे यांच्या 'जलमबेडी' कादंबरीचे वाङ्मयीन मूल्यमापन | प्रा.लालबा दुमटकर | 197 |
| 41 | १९९० नंतरची संस्कारशील बालकादंबरी | संतोषकुमार राठोड | 201 |
| 42 | अहिल्याबाईंच्या कार्यकर्तृत्वाचा वेध घेणारी कादंबरी 'कर्मयोगिनी' | डॉ. रेखा वडिखाये | 205 |
| 43 | 'वर आभाळ खाली धरती' : एक आकलन | डॉ. गायत्री गाडेकर | 209 |
| 44 | अशोक कोतवाल यांचे ललितगद्य : स्वरूप आणि वैशिष्ट्ये | प्रा.मंजुळा साळवे | 214 |
| 45 | वाचन-संस्कृती आणि ग्रंथालयाची भूमिका | डॉ.जे.एफ.पाटील | 218 |
| 46 | महात्मा फुलेंच सामाजिक न्याय आणि सामाजिक सुधारणेतील योगदान | डॉ. वसंत खरात | 222 |
| 47 | राजर्षी शाहू महाराज यांचे शिक्षण आणि अस्पृश्यता निवारण्याचे कार्य | डॉ. लता आंदे | 227 |
| 48 | गोपाळ गणेश आगरकरांचे सामाजिक तत्त्वज्ञान | श्री. सुरेश दांडगे | 232 |
| 49 | लाला लजपतराय यांचे सामाजकार्यातील योगदान | डॉ. राजेंद्र रासकर | 238 |
| 50 | महात्मा गांधीजींचे राष्ट्रवादविषयक विचार | डॉ. विक्रमराव पाटील | 243 |
| 51 | महात्मा गांधी : अहिंसा व समकालीन हिंसेचे वास्तव | डॉ. एकनाथ खरात | 246 |
| 52 | महात्मा गांधीचे सामाजिक व स्त्री-सुधारणा धोरण | अनिल वासनिक | 256 |
| 53 | महात्मा गांधीजींची ग्राम स्वराज्याची संकल्पना | डॉ. विजया राऊत | 259 |
| 54 | स्त्री साहित्यातून स्त्री मनाचा वेध | प्रा. वंदना नेमाडे | 262 |
| 55 | स्त्रीभ्रूणहत्या : स्त्रीवादी दृष्टीकोन | डॉ. अश्विनी खापरे | 266 |
| 56 | स्त्री लेखिकांचे अनुवादित मराठी साहित्य | प्रा. तुकाराम भवर | 271 |
| 57 | पेशवेकालीन स्त्री जीवन | डॉ.लता आंदे | 277 |
| 58 | मानवी हक्क : महिला व बालके | डॉ. धनराज चौखुंडे | 281 |
| 59 | खान्देशातील कुंभार समाजाच्या सामाजिक, आर्थिक स्थितीचे अध्ययन | सचिन कुंभार | 287 |
| 60 | इतिहासाच्या अभ्यासात वस्तुसंग्रहालयाचे महत्त्व | डॉ. निवासराव वरेकर | 292 |
| 61 | चिमूर तालुक्यातील असंघटीत कामगारांच्या आर्थिक समस्यांचे अध्ययन | डॉ. हरेश गजभिये | 296 |
| 62 | विदर्भातील शेतकरी चळवळीच्या नेतृत्त्वाचा अभ्यास : एक सामीक्षात्मक अध्ययन | प्रा.राजू लिपटे | 300 |
| 63 | बॅकांच्या राष्ट्रीयकरणाची ५० वर्षे | डॉ.ए.डी.गोस्वामी | 303 |
| 64 | पूर्व-पश्चिम विदर्भातील शेतीप्रश्नांच्या राजकीयकरणाचा राज्यशास्त्रीय अभ्यास | प्रा.राजू लिपटे | 307 |
| 65 | जिल्हा नियोजन समितीच्या वार्षिक योजनांचा अभ्यास | प्रा. दिपक चौधरी | 311 |
| 66 | अहमदनगर जिल्ह्यातील राजकीय प्रक्रिया :राजकीय पक्षांची वाटचाल (१९९०ते २०१९)-एक अभ्यास | श्री जिजाभाऊ घुले आणि डॉ.संजय गायकवाड | 317 |


255

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625 (2019),
Vol. 6, Issue 4 (B)
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
Oct.-Nov.-Dec. 2019

# लाला लजपतराय यांचे समाजकार्यातील योगदान

डॉ. राजेंद्र नामदेव रासकर
इतिहास विभाग प्रमुख
डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय औंध पुणे ६७
मोबाईल नंबर. ९९६०६५९९६८४
Email –rajendraraskar2550@Gmail.Com

**प्रस्तावना:—**

लाला लजपतराय राजकीय नेते नव्हते तर ते समाजसुधारक शिक्षण तज्ञ होते. नामवंत वकील, लेखक, अभ्यासू पत्रकार आणि अर्थतज्ञ होते. त्यांनी आयुष्यभर वरील प्रत्येक क्षेत्रामध्ये महत्वपूर्ण कामगिरी केली होती. त्यामुळे हिंदुस्थानातील अनेक थोर विचारवंत यांनी त्यांच्या कार्याची दखल घेतली होती. परदेशातील अनेक थोर राजकीय नेते व विचारवंत यांनी देखील लाला लजपत राय यांच्या कार्याचे कौतुक केले आहे.[१]

**लाला लाजपत राय यांचे सामाजिक विचार:—**

लाला लजपतराय यांनी राष्ट्रीय पुनर्निर्मितीच्या कार्याला आणि सामाजिक जबाबदारी वर भर दिला होता. त्यांनी व्यक्ती हितापेक्षा समाजातला अत्यंत महत्त्व दिले होते अनेक वेळा परदेश दौरा केला होता. परदेशातील समाज, संस्कृती व धर्म यांचा त्यांनी अभ्यास केलेला होता. परदेशाप्रमाणे हिंदुस्थानातील जनता ही हुशार व बुद्धिमान आहे. यासंबंधी त्यांचे असे म्हणणे होते कि, ''भारतातील जनता शारीरिक, बौद्धिक नैतीक आणि अन्य कोणत्याही दृष्टीने जगातील कोणत्याही राष्ट्रातील जनतेपेक्षा कमी प्रतीची नाही. परंतु भारतीयांमध्ये सर्वात मोठा दोष म्हणजे समाजाप्रती असलेल्या त्यांच्या जबाबदारीची ते उपेक्षा करतात. त्यामुळे त्यांच्यात अपूर्व क्षमता तसेच विशेष वैशिष्ट्ये असूनही त्यांना गुलाम व्हावे लागले". समाजातील प्रत्येक व्यक्तीला सामाजिक जबाबदारीचे भान असेल तर राष्ट्राचा आणि समाजाचा विकास होण्यास विलंब लागणार नाही. त्यांचे असे स्पष्ट मत होते की, ''भारतीयांनी व्यक्तिगत अथवा वर्ग हिताला महत्व अधिक दिलेली आहे. त्यामुळे ते कधीच संघटित होऊ शकले नाही."

आजसुद्धा भारतीय जनता परकीय शक्तीला विरोध करताना स्वत:ला दुर्बल समजतात. भारताची अवनती तसेच राजकीय गुलामगिरी यांचे भयानक स्वरूप स्पष्ट करून त्यांनी भारतीयांना असा संदेश दिला की, ''भारतीयांनी आपली सामाजिक जबाबदारी प्रथम समजावून घेऊन राष्ट्रीय हिताला सर्व प्रथम स्थान द्यावे. त्यांनी असा ठाम निश्चय करावा की, देशभक्ती हा त्यांचा प्रथम तसेच श्रेष्ठ धर्म असून, त्यांचे उपास्य दैवत मातृभूमी आहे. देशातील प्रत्येक व्यक्तीने देशभक्ती हे आपले उदात्त ध्येय ठेवून देशासाठी बलिदान करण्यास तयार व्हावे." लाला लाजपतराय यांचे असे म्हणणे की, ''आमचे सामाजिक आर्थिक धार्मिक आणि राजकीय जीवन तेव्हाच समृद्ध तसेच आदर्श बनू शकेल की जेव्हा आम्ही भारतीय सामाजिक सुधारणेच्या दिशेने प्रगती करू." म्हणूनच लाला लजपतराय यांनी सामाजिक सुधारणेवर अधिक भर दिला होता.[२]

भारतीय समाजा विषयी त्यांनी असे म्हटले की, ''कोणत्याही मानवी समाजाचे, समाज या नात्याचे जे सामर्थ्य असते ते त्या समाजाच्या घटकांमध्ये कर्तव्याची जी जाणीव असते त्या त्यावरच सर्वस्वी अवलंबून असते. समाज सुरक्षित असावा व समाजाचे कल्याण व्हावे ही जाणीव व्यक्तीश: प्रत्येक घटकामध्ये जेवढी मोठी व तीव्र असेल तेवढा तो समाज समर्थ होईल. महत्पदाला पोहचेल आणि आमच्यामध्ये जर कोणती उणीव

256

E-ISSN : 2348-7143
Oct.-Nov.-Dec. 2019

**थोर समाजसेवक:–**

लाला लजपतराय यांनी राजकारणाबरोबरच समाजसुधारणा, शिक्षण व हिंदूसंघटन इत्यादी क्षेत्रातही प्रभावी कामगिरी बजावली. विशेष म्हणजे समाजसेवेच्या कार्यात आयुष्यभर वाहून घेतले. जनतेचा सेवक व्हायचे, जनतेवर प्रेम करायचे, पण तिचा गुरू होण्याचा हाव धरून तिला आज्ञेत वागविण्याचा प्रयत्न करावयाचा नाही. हा त्यांनी आपला बाणा ठरविला होता. कोणीही दुःखी देशबांधव दिसला की, त्याची सेवा करायची, त्याचे दुःख दूर करण्याकरिता स्वत: कष्ट भोगायला सिद्ध व्हायचे हाच त्यांचा धर्म होता. आकाशात मनोरे बांधून ध्येयवादी म्हणवून घेण्यापेक्षा समाजात राहून समाजाची सेवा करून तिची मनोभूमिका सिद्ध करावयाची व त्यात राष्ट्र धर्माचे बीज पेरावयाचे त्यातच त्यांना समाधान वाटत होते. वाजवी पेक्षा फाजील घाई न करता विधायक कार्याच्या मार्गाने समाजाला जागृत व संघटीत करण्याकडे त्यांचा कल होता. त्यांचे समाजकार्यातील योगदान फार मोठे आहे.[६]

**दिन दुबळ्यांचे व दलितांचे सेवक:–**

लाला लजपतराय यांनी समाज कार्य करताना गोरगरिबांना न्याय मिळवून दिला. दलितांची व दुःखितांची सेवा करण्यासाठी ते नेहमी तत्पर असत. त्यांच्या मदतीसाठी त्यांनी केलेल्या कष्टातून त्यांच्या सार्वजनिक जीवनातील विविधता प्रत्ययास येते. त्यांना गरिबांच्या व दलितांच्या बाबत किती कळवळा होतो हे स्पष्ट होते.[७]

**हरिजनांन करिता शिक्षण संस्था:–**

हिंदुस्थानातील प्रत्येक व्यक्तीला शिक्षण घेण्याचा अधिकार आहे. त्यांनी इ.स. १९१२ रोजी 'स्वतंत्र हरिजन संस्थेची' स्थापना केली. त्याचा लाभ हरिजन वर्गाला झाला. शिक्षणाचे महत्त्व हिंदुस्थानातील तळागाळातील वर्गापर्यंत पोहोचले या शिवाय देशाची प्रगती होणार नाही असा त्यांचा विचार होता.[८]

**लोकसेवा मंडळाची स्थापना:–**

लाला लजपतराय यांनी शैक्षणिक सुधारणा करताना नवीन वैचारिक दृष्टिकोन मांडला. केवळ पुस्तकी ज्ञान विद्यार्थ्यांना जीवनाची दिशा देऊ शकत नाही. त्यामुळे तरुणांना राजकीय ज्ञान मिळावी हा त्यांचा हेतू होता. राष्ट्रीय शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी लोकसेवा मंडळाची त्यांनी इ.स. १९२१ मध्ये स्थापना केली. लाला लजपतराय यांना पुस्तकी ज्ञान मान्य नव्हते. राजकीय शिक्षणाची जाणीव तरुणांना व्हावी. शिक्षणातील अमुलाग्र बदल केल्याशिवाय पर्याय नाही. असा त्यांचा शिक्षण विषयक दृष्टीकोण असल्याची लक्षात येते.[९]

**राधाकृष्ण हायस्कूल ची स्थापना (१९११):–**

लाला लजपतराय यांना शिक्षण घेताना अनेक अडचणींना तोंड देणे भाग पडले होते. त्यांना एकाच गावात अथवा शहरात शिक्षण घेता आले नव्हते. आपल्या गावी एक चांगली शाळा असावी असा त्यांचा दृष्टिकोन होता. त्यामुळे त्यांनी आपल्या मूळ गावी जगराव येथे इ.स. १९११ रोजी एक शाळा सुरू केली. त्या शाळेला त्यांनी आपल्या वडिलांचे 'राधाकृष्ण हायस्कूल' नाव दिले. त्यावेळी सुमारे १२ हजार रुपये खर्च करून राधाकृष्ण हायस्कूल सुरू केले. त्यामागे आपल्या गावातील मुलांना आपल्या गावात शिक्षण मिळावे असा त्यांचा दृष्टिकोन होता.[१०]

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya
257

E-ISSN : 2348-7143
Oct.-Nov.-Dec. 2019

संदर्भसूची: –

१. श्री. मोहनलाल 'लाला लजपतराय जीवन और कार्य', होशियारपुर, विश्वेश्वर वैदिक संस्थान, प्रथमावृत्ती, १९६५, पृष्ठ क्रमांक ४.
२. डॉ. पाटील वा. भा. 'प्राचीन व आधुनिक भारतीय विचारवंत', प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, प्रथमावृत्ती २०१९, पृष्ठ क्रमांक ३२३.
३. आपटे उमाकांत केशव, 'पंजाब केसरी देशभक्त लाला लजपतराय', प्रकाशक अभिनव ग्रंथमाला, नागपूर, दुसरी आवृत्ती २००३, पृष्ठ क्रमांक ९८.
४. फडके सदाशिव कृष्णा, 'लाला लजपत राय यांचे चरित्र', नवयुग धर्माल प्रकाशन – फडके सदा शिव कृष्णा, पुणे १३१, पृष्ठ क्रमांक २३४.
५. विद्यालंकार सत्यकेतू, प्रो. वेदालंकर हरिदत्त, डॉ. भारतीय भवानी लाल, 'आर्य समाज का इतिहास' भाग चौथा, प्रकाशक कार्य स्वाध्याय केंद्र, दिल्ली, १९८५, पृष्ठ क्रमांक ४७७.
६. आपटे उमाकांत केशव, 'पंजाब केसरी देशभक्त लाला लाजपत राय', उपरोक्त, पृष्ठ क्रमांक १०९.
७. रामराव टी. के., 'लाला लजपत राय', भारत भारती, दुसरी आवृत्ती १९८२, पृष्ठ क्रमांक १६.
८. शर्मा नरेश कुमार नरेश, 'भारतीय राष्ट्रीय कांग्रेस का इतिहास', प्रकाशक साहित्यगार, जयपुर, प्रथमावृत्ती २००७, पृष्ठ क्रमांक ७०.
९. मित्तल सतीश चंद्र, 'देवरत्न लाला लजपत', प्रकाशक चंद्र भ्राता पुस्तक भंडार, कोर्ट रोड सहारनपुर प्रथमावृत्ती १९९९, पृष्ठ क्रमांक ६३.
१०. फडके सदाशिव कृष्ण, उपरोक्त, पृष्ठ क्रमांक २७२.
११. फडके सदाशिव कृष्ण उपरोक्त पृष्ठ क्रमांक २७३.
१२. गुप्त विश्व प्रकाश, ' लाला लजपत राय व्यक्ति और विचार', नमन प्रकाशन, दिल्ली, २००७, पृष्ठ क्रमांक १४३.
१३. -Shahi Shyamnandan, 'Lala Lajpatrai life and Thought', Chankya Publication, Delhi, First Published, 1986, Page No.212.
१४. Shahi Shyamnandan, mijksDr] i`"B Øekad 213-

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *

258